# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
०२०- २५६०१२५८
०२०- २५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: dyracademic@unipune.ac.in

संदर्भ : सी.सी.ओ/1207

दिनांक : 26/05/2018

मा. प्राचार्य / सचिव
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक

विषयः स्थानिक निवड समितीने शिफारस करून नियुक्त केलेल्या उमेदवारांचे व तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहीत मुदतीत सादर करण्याबाबत...

महोदय,

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या उमेदवारांचे निवड समिती अहवाल व शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विहीत मुदतीत या विभागात सादर करण्याबाबत आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षासाठी स्थानिक निवड समितीच्या अहवालानुसार नेमणूक करण्यात आलेल्या उमेदवारांच्या शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव दि. १ जून ते ३० सप्टेंबर २०१८ या कालावधीत निवड समितीची सभा आयोजित करण्यात आलेल्या दिनांकापासून ७२ तासाच्या आत निवड समिती अहवाल विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात सादर करणे आवश्यक आहे. तसेच दि. १ जून ते ३० सप्टेंबर २०१८ या कालावधीत रूजू दिनांकापासून ३० दिवसांच्या आत ऑनलाईन पद्धतीने शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव भरून व हार्ड कॉपी (३० दिवसांच्या आत) सादर करावी.

२) महाविद्यालये / संस्थांकडून ज्या उमेदवारांची २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्ती होऊन शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर केले असतील असे उमेदवार किंवा ज्यांना शिक्षक मान्यता मिळाली असेल असे शिक्षक त्यांनी महाविद्यालय / संस्था सोडले असेल तर अशा उमेदवारांच्या जागी नवीन उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव ऑनलाईन भरण्यासाठी शैक्षणिक विभागातील संबंधित अधिका-याची मान्यता घेऊन संबंधित महाविद्यालयापुरतेच (नोकरी सोडून गेलेल्या शिक्षकांना संबंधित महाविद्यालयाने /संस्थेने रितसर रिलिव्हींग पत्र देणे आवश्यक आहे) संकेतस्थळ खुले करून देण्यात येईल.

३) तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवारांच्या मान्यतेचे प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रत्येक सत्रात प्रत्येकी एक महिना मुदत वाढविण्यात येत असून प्रथम सत्रासाठी दि. १ जुलै २०१८ ते ३१ ऑगस्ट, २०१८ व द्वितीय सत्रासाठी दि. १ डिसेंबर २०१८ ते ३१ जानेवारी २०१९ या कालावधीत ऑनलाईन भरून याच कालावधीत त्याची हार्ड कॉपी या विभागात सादर करावी.

उपरोक्त नमूद केलेल्या दोन्ही कालावधीमध्ये शैक्षणिक वर्षासाठीचे तासिका तत्वावरचे प्रस्ताव सादर करावे. सदर तारखेनंतर प्रस्ताव सादर केल्यास व अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

२६/५/१८

उपकुलसचिव

(शैक्षणिक विभाग)